# आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र पुरस्कृत डॉ. आंबेडकर मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना.

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नांव | केंद्र पुरस्कृत डॉ. आंबेडकर मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना |
| 2 | योजने बद्दलचा शासन निर्णय | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-2016/प्र.क्र.378/तांशि-4, दि. 5 डिसेंबर, 2018. |
| 3 | योजनेचा स्वरूप | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र पुरस्कृत डॉ. आंबेडकर मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना केंद्र शासन राबवित आहे. ही योजना केवळ शासकीय संस्थामध्ये इयत्ता 10 वी नंतरच्या (इयत्ता 11 वी व 12 वी वगळून) मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांकरीता लागू करण्यात आली आहे. |
| 4 | योजनेचा उद्देश | केंद्र शासन ही योजना आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील (EBC) इयत्ता 10 वी नंतरचे (इयत्ता 11 वी व 12 वी वगळून) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | ही योजना भारताचे नागरीक असलेल्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकरीता लागू आहे. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये 1.00 लाख पेक्षा जास्त नसावे.<br>२. ही योजना कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपुरती मर्यादित आहे.<br>३. ही योजनेखालील पात्र विद्यार्थ्यांने अन्य शिष्यवृत्तीचा लाभ घेता कामा नये.<br>४. या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांची समाधानकारक प्रगती व वर्तणूक यावर अवलंबून राहणार आहे. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | १. विद्यार्थ्यांने या योजनेच्या लाभासाठी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.<br>२. मागील वर्षाचे गुणपत्रकाची छायांकीत प्रत.<br>३. सक्षम प्राधिकरणाने दिलेले रहिवास प्रमाणपत्र.<br>४. सक्षम प्राधिकरणाने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र.<br>५. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची झेरॉक्स प्रत. |
| 8 | दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप | या योजनेंतर्गत निर्धारित दराने परिरक्षण भत्ता, अंध विद्यार्थ्यांकरीता वाचन भत्ता, विद्यापीठ अथवा संस्थाकडून आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे ना परतावा शुल्क, रुपये 900/- प्रतिवर्षी मर्यादेपर्यंत अभ्यास दौरा खर्च व रूपये 1000/- पर्यंत शोध प्रबंध टायपिंग व प्रिटींग खर्च. |
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | नविन मंजूरी / नुतनिकरणासाठी ऑफलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांस नविन (Fresh) शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे अशा विद्यार्थांनी पुढील वर्षाचे अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेनंतर नुतनीकरणाचा अर्ज सद्यस्थितीत ऑफलाईन पध्दतीने महाविद्यालय/संस्थामार्फत संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे. |